# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/1507/2024-25 दि. 21/08/2024

**परिपत्रक**

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम 1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: मिभाम-1112/प्र.क्र.88/नवि-28, दि.05 डिसेंबर, 2022 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार लिपीक-टंकलेखक (गट-क) या पदासाठी आवश्यक असणारी अर्हता विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महनगरपालिका आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना लिपीक टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने पात्र चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना लिपीक टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्यासाठी दि.01/01/2024 ची प्रारुप सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करावयाची आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी चतुर्थ श्रेणी संवर्गात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांना सुचित करण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण, मराठी 30 श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र तसेच एम.एस.सी.आय.टी परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा कर्मचाऱ्यांनी सदर शैक्षणिक कागदपत्रे 07 दिवसात आस्थापना विभागात सादर करण्यात यावे.

21/8/2024

(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख खातेप्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका.

/- सर्व विभागप्रमुख खातेप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व चतुर्थ कर्मचाऱ्यांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणावे.